नाशिक
दि. १२/०३/२०२१

# प्रेसनोट

## आलोसे अरुण हरी लहाने, पोलीस नाईक/३७६, नेमणुक नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांना १,५००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना ला.प्र.वि. नाशिक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | आलोसे अरुण हरी लहाने, पोलीस नाईक/३७६, नेमणुक नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १,५००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,५००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचेविरुध्द नाशिकरोड पोलीस ठाणे येथे सन २०१४ साली गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नाशिकरोड न्यायालयात दाखल असून सदर खटल्याचे सुनावणीचे कामकाज चालु आहे. दि. ५/२/२०२१ रोजी तक्रारदार हे खटल्याचे सुनावणी दरम्यान न्यायालयात हजर न राहील्याने मा.न्यायालयाने त्यांचेविरुध्द अजामीनपात्र वॉरंट काढले होते. दि.७/३/२०२१ रोजी तक्रदार यांनी सदर अजामिनपात्र वॉरंट मा.न्यायलयातून रद्द करुन आणलेले आहे.<br>सदर वॉरंटची बजावणी करण्याचे कामकाज आलोसे अरुण हरी लहाने, पोलीस नाईक/३७६, नेमणुक नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांचेकडे असल्याने त्यांनी तक्रारदार यांना सदरचे वॉरंटमध्ये अटक न करुन वॉरंट रद्द करेपर्यंत वेळ देऊन मदत केल्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे १५००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे अरुण हरी लहाने, पोलीस नाईक/३७६, नेमणुक नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांनी तक्रारदार यांचेकडे १,५००/— रुपये लाचेची मागणी करून आज दि. १२/०३/२०२१ रोजी सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष नाशिकरोड पोलीस ठाणे आवारातील जुनी शहर पोलीस लाईन, रुम नं. १ मध्ये स्विकारली असता त्याना पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द नाशिकरोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

Vadhav 12.03.2021

( विजय जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता